**मे. डेस्टिनो मिनरल्स ॲण्ड मेटल्स प्रा. लि., प्लॉट नं. बी-४१/३, म.औ.वि.मं. चंद्रपूर, घुग्घूस रोड, ता. जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित फेरो अलॉयच्या उत्पादनाकरिता १X५ MVA सब्मर्ज्ड आर्क फरनेस प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २५/०४/२०२३ |
| वेळ | : | दुपारी १२:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, मे. डेस्टिनो मिनरल्स ॲण्ड मेटल्स प्रा. लि., प्लॉट नं. बी-४१/३, म.औ.वि.मं. चंद्रपूर, घुग्घूस रोड, ता. जि. चंद्रपूर. |

**प्रस्तावना:-**

मे. डेस्टिनो मिनरल्स ॲण्ड मेटल्स प्रा. लि., प्लॉट नं. बी-४१/३, म.औ.वि.मं. चंद्रपूर, घुग्घूस रोड, ता. जि. चंद्रपूर येथे प्रस्तावित फेरो अलॉयच्या उत्पादनाकरिता १X५ MVA सब्मर्ज्ड आर्क फरनेस प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र या प्रकल्पाच्या उभारणीच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक २९ ऑगस्ट २०२२ रोजी रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. डेस्टिनो मिनरल्स ॲण्ड मेटल्स प्रा. लि., प्लॉट नं. बी-४१/३, म.औ.वि.मं. चंद्रपूर, घुग्घूस रोड, ता. जि. चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक ०७/०२/२०२३ अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र नवराष्ट्र, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक २२/०३/२०२३ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, चंद्रपूर.
१०. तहसिल कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
११. पंचायत समिती कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
१२. ग्राम पंचायत कार्यालय, चिंचाळा, ता. जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, पडोली, ता. जि. चंद्रपूर.

वरिल अनुक्रमांक ०५ ते १३ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब

करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-२४/२०२३ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डबल्युपीसी) पीएच/बी-२३०३२९-एफटीएस-०२४२ दिनांक २९/०३/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | समन्वयक |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ०९ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्त:-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री विनोद ध. शुक्ला, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री महोदव खेडकर, ~~उप विभागीय अधिकारी, मूल~~ अपर जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील

कार्यरत विविध संस्था व मोठ्या संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांच प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

१) **श्री राजेश बेले, संस्थापक अध्यक्ष, संजीवनी सामाजीक संस्था, चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सुरवातीलाच कंपनीच्या पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी मिळालेली आहे. तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदरहू प्रकल्पास परवानगी दिली आहे काय? | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ चंद्रपूर यांनी सांगितले की नियमाप्रमणे प्रकल्प स्थापना संमतीपत्र (Consent to Establish – C to E) प्रदान करण्यात आलेले आहे. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीनंतर भारत सरकारकडून पर्यावरण अनुमती कंपनीस प्राप्त झाल्याशिवाय म..प्र.नि.मंडळ प्रकल्प सुरु करण्याचे संमतीपत्र (Consent to Operate – C to O) प्रदान करणार नाही. |
| २) | कंपनीच्या अहवालात नोंद आहे की सन २०२० साली चंद्रपूर एमआयडीसीत प्रदूषणाबाबतची अस्वस्थ स्थिती आहे. हा प्रकल्प प्रदूषण करणारा प्रकल्प आहे. तुम्ही किती कोळसा रोज जाळणार याची माहिती ही पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नाही. ती अहवालात देणे अपेक्षित होते. आपण प्रकल्पात फरनेस कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यातून किती वेस्ट मटेरिअल बाहेर पडेल हे सांगितलेले नाही. फरनेसमधून बाहेर पडणारा धूर, त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येणार? | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की हा प्रकल्प प्रदूषणकारी आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. कुठल्याही प्रकल्पात थोड्या प्रमाणात प्रदूषण होते. मात्र आता एवढी प्रचंड तांत्रिक प्रगती झालेली आहे की त्यामुळे आपण प्रदूषण पूर्णपणे नियंत्रणात आणू शकतो. या प्रकल्पातून जल प्रदूषण होणार नाही. कारण या प्रकल्पात पाणी हे फक्त सयंत्रे कुलींग करण्यासाठीच वापरात येणार आहे. ते पाणी आतल्याआत मशिनमध्ये फिरेल. त्या पाण्याचा मातीशी किंवा डस्टशी संबंध येणार |

| | | |
|---|---|---|
| | | नाही. .त्यामुळे पाण्याची गुणवत्ता म्हणजे जे पाणी एमआयडीसी कडून मिळेल तेच पाणी परत एमआयडीसीला परत देण्यात येईल. . पाण्याचा डिस्चार्ज/निःस्सारण होणार नाही, त्यामुळे पाण्याचे प्रदूषण होणार नाही. त्यामुळे तेथील नाले, माती ही प्रदूषित होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. |
| ३) | प्रकल्पापासून १०० मीटर अंतरावर लोकवस्ती आहे. हा घातक प्रदूषण करणारा प्रकल्प आहे. त्या धुरातून सूक्ष्मकणांमुळे मानवाला, सर्व वन्य प्राण्यांना, पाळीव प्राण्यांना त्रास होणार आहे. सदरहू क्षेत्र चिंताजनक प्रदूषित क्षेत्र (Highly Critical Polluted Area) असल्याने येथे प्रकल्प उभारणे योग्य नाही. प्रकल्पाचे क्षेत्र १.४ हेक्टर असून त्या कोळशाचा स्टॉक, वेस्ट मटेरियल स्टॉक या लहान प्रकल्प क्षेत्रात होऊ शकत नाही. आपण प्रकल्पात नमुद केले की येथे पाण्याचे स्त्रोत नाहीत. तर प्रकल्पाच्या दोन्ही बाजूस नाला आहेत. या नाल्यातून पावसाळयात शेतक-यांना पाणी जाते, त्याचप्रमाणे या नाल्यातून ईरा नदीला पाणी जाते. हे दोन्ही नाले प्रकल्पाच्या आजूबाजूला वाहतात. मात्र अहवालात प्रकल्पाजवळ नाले नाहीत असे लिहिलेले आहे. प्रकल्पात दर्शविण्यात आलेली पाण्याची, हवेची गुणवत्ता ही चुकीची व खोटी आहे. ती जनतेची दिशाभूल करणारी आहे. | पुढील मुद्दा हवा प्रदूषणाबाबत. तर प्रकल्पात हवा प्रदूषणाचा स्त्रोत आहे की प्रकल्पात कोक वापरण्यात येणार आहे. कोक म्हणजे कोळशावर प्रक्रिया केली जाते, त्यातील व्होलाटाईल मॅटर असतात म्हणजे त्याच्यात प्रदूषित करणारे जे घटक असतात, ते बाहेर काढल्या जातात. कोक हा येथे बनत नाही, तो मोठ्या स्टील प्रकल्पात बनतो, भिलाई स्टील प्रकल्प, बोकारो स्टील प्रकल्प इत्यादी. कोकमधून कुठलेरी कार्बन उत्सर्जन होत नाही. म्हणजे ९८% उत्सर्जन होत नाही, २% उत्सर्जन होते, त्यासाठी बॅग फिल्टर लावण्यात येईल. त्यामुळे जे धुलीकण आहेत, ते त्या बॅग फिल्टरमध्ये अडकतात व शुध्द हवा ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांपेक्षाही कमी म्हणजे ५० एमएल/एनएमक्युब पेक्षा कमी म्हणजे ३० एमएल/एनएमक्युब एवढा असेल. म्हणजे हवा प्रदूषण होणार नाही. कारण आम्ही आमची अशी सयंत्रणा असेल की ते ३० एमएल / एनएमक्युब असेल.<br>त्यांनी पुढे सांगितले की प्रकल्प उत्पादनात जो स्लॅग होतो, त्याचा संबंध पाण्याशी होणार नाही, ना हवेशी होणार नाही. स्लॅगचा उपयोग हा खड्डे भरण्यासाठी वापरण्यात येणार आहे. |
| ४) | प्रकल्पात इंधन म्हणून कोळसा वापरण्यात येणार आहे. त्यातून $SO_2$ वायू निघणार असून त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल? तसेच प्रकल्पातील स्टॅकची उंची दिलेली नाही. तसेच | असे सूचित केले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल चुकीचा आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी शासनाच्या पारित निर्देशांनुसार |

| | | |
|---|---|---|
| | शासनाच्या निर्देशांप्रमाणे, सदरहू प्रकल्पासाठी चार एकर जागा हवी. शासनाचा आदेश (जी.आर.) उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तकांनी एमआयडीसीला दिलेल्या अहवालात २० कोटीपेक्षा जास्त गुंतवणूक दाखविलेली असून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात ती कमी दाखविलेली आहे. | प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघाच्या क्षेत्राचे सर्वेक्षण केलेले आहे. त्यानुसारच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यात आलेला आहे. शासनाच्या पारित मानकांनुसारच येथील जल, हवा यांची पातळी आहे.<br>पुढील मुद्दा चिमणीची उंची. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या निर्देशांनुसारच चिमणीची उंची ठेवण्यात येईल. त्यापेक्षा कमी ठेवताच येत नाही.<br>आता प्रकल्प क्षेत्राबाबत आपण प्रश्न उपस्थित केला. आपण जागा कमी आहे असा आक्षेप नोंदविला होता. त्याचे उत्तर देताना प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आमची फरनेस ही फक्त पाच मीटरची आहे.<br>प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पाण्याचा एकही थेंब वाया जाणार नाही, कारण पाण्याचा प्रकल्पात पुनर्वापर होत आहे. |
| ५) | त्यावेळी काही उपस्थितांना प्रश्न उपस्थित केला की या गोष्टी फक्त कागदावरच राहतात. आम्हांला गावात पाणी मिळत नाही. जे मिळते, ते कंपनीने वापरल्यावर आम्हांला पाणीच राहणार नाही.<br>श्री राजेश बेले यांनी सांगितले की आपण प्रतिपादन करता की वायू प्रदूषण होणार नाही. पण प्रकल्प लघु, मध्यम किंवा मोठा प्रकल्प असो, प्रदूषण हे प्रदूषण आहे, ते या प्रकल्पातूनही होणारच. सर्व कंपन्या अत्याधुनिक सयंत्रणा लावतात व प्रदूषण होणार नाही असे सांगतात. पण चंद्रपूर हे सर्वात जास्त प्रदूषित असून लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झालेला आहे. प्रदूषणामुळे येथील लोक मृत्युमुखी पडले यांची शासकीय आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध आहेत.<br>श्री राजेश बेले यांनी पुढे सांगितले की कुठलाही प्रकल्प हा प्रदूषण करतो म्हणून बंद करण्यात येत | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे फक्त बँक गॅरंटी घेते. मी गेले २०१० पासून प्रदूषणावर काम करत आहे. प्रदूषण केल्याने कंपनीच्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविला जात नाही. ही शोकांतीका आहे. मनुष्याच्या जीवाला धोका निर्माण होतो. तरी आम्ही या प्रकल्पास विरोध करतो. जर प्रकल्पास परवानगी मिळाली, तर आमच्याकडून उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात येऊन त्यावर स्थगिती आणण्यात येईल. | |
| ६) | त्यावेळी श्री राजेश बेले यांनी सांगितले की पेपरात जाहिर सूचनेबरोबरच परिसरातील ग्रामपंचायतीत बोर्ड लावण्यात यावेत. त्यामुळे ग्रामस्थांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची माहिती कळेल. तरी परिसरातील १० कि.मी. परिघातील गावात नोटीस बोर्ड लावण्यात यावेत. त्याचप्रमाणे सर्व पर्यावरण दस्तावेज उपलब्ध करुन देण्यात यावा. श्री बेले यांनी आक्षेप नोंदविला की येथून १० कि.मी. अंतरावर चंद्रपूर महानगरपालिका असून त्यांनाही नोटीस देण्यात यावी. तोपर्यंत ही जनसुनावणी रद्द करण्यात येऊन नविन तारीख देण्यात यावीत. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थितांनी, ग्रामपंचायत प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप याची नोंद घेण्यात आलेली आहे. |

## २) श्री प्रविण सिंग, माजी सरपंच, खुटाळा, ता. जि. चंद्रपूर:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | प्रकल्पापासून ३०० मीटर अंतरावर कुटाळा गाव आहे. त्यांना प्रकल्पाबाबत पत्र गेलेले नाही. त्यामुळे त्या गावातील लोक आलेले नाहित. या प्रकल्पाचा सर्वात जास्त त्रास हा तेथील ग्रामस्थांवर होणार आहे. प्रकल्प अधिकारी सांगतात की पाणी भरपूर आहे. पण आमच्या गावात प्यायला पाणी नाही. ३०० फूट खोल खणूनही पाणी मिळत नाही. नंतर वाऱ्यामुळे धूर गावात येणारच आहे. त्याचा परिणाम शेतातील पीकांवर होणार. आमचे | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की सर्व अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण संयत्रणा प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पात काम करणा-या कामगार व कर्मचारी यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येईल.<br>त्याचप्रमाणे कंपनीच्या सीएसआर निधींतर्गत प्रकल्प परिसरात विविध सामाजीक उपक्रम राबविण्यात येतील, त्यामध्ये प्रकल्प |

| | | |
|---|---|---|
| | हातावर पोट आहे. आमची मुले येथे राहतात. तरी आमचा या प्रकल्पास पूर्ण विरोध आहे. | परिसरातील गावात आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येतील. |

३) श्री विवेक धोटे, ग्रामपंचायत सदस्य, चिंचाळा, ता. जि.चंद्रपूरः

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प क्षेत्राच्या १० कि.मी. अंतरावरिल सर्व ग्रामपंचायतींना सूचित करणे आवश्यक होते. मात्र कुटाळा ग्रामपंचायतीस कळविण्यात आलेले नाही असे बैठकीत सांगण्यात आले. तरी ही जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी. त्याचप्रमाणे चिंचाळ ग्रामपंचायतीस काल बैठकीची माहिती कळविण्यात आलेली आहे. आता प्रदूषण होणार नाही असे कंपनी सांगते. तर एमआयडीसीत जे फ्लाय एश क्लस्टर जे सुरु झालेले आहे, ते बंद नसून त्याची धूळ आमच्या घरांवर उडते. त्याचा व्हिडिओ त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस दाखविला. त्यावेळी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याच्या सूचना केल्या. | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने बैठकीच्या तीस दिवस अगोदर पर्यावरणविषयक जाहिर सूचना स्थानिक व राष्ट्रीय वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली होती. त्याचप्रमाणे संबंधित सर्व ग्रामपंचायत कार्यालयांना प्रकल्पाचे पर्यावरणविषयक दस्तावेज उपलब्ध करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे एमआयडीसी चंद्रपूर येथे प्रकल्पाचे पर्यावरणविषयक दस्तावेज उपलब्ध करण्यात आलेले होते. तेथेही संबधित प्रकल्पाबाबतचे पर्यावरणविषयक दस्तावेजांचे अवलोकन करता आले असते. |
| २) | प्रकल्पात ४० लोकांना रोजगार मिळेल असे सांगितलेले आहे. तर कुठल्या संवर्गात रोजगाराची संधि मिळेल, म्हणजे कुशल, अर्धकुशल का अकुशल | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की कुशल म्हणजे पदवी आणि कॉलेजमध्ये प्रशिक्षण मिळते. अनुभव हा कुशलतेचाच भाग आहे. |

४) <u>श्री प्रकाश शेंडे, सरपंच, ग्रामपंचायत नागाळा, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण बैठकीत सांगितले की एमआयडीसी कार्यालयात संबंधित प्रक्लपाविषयी सर्व पर्यावरण दस्तावेज उपलब्ध केलेला आहे. जशी आपली | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे, त्याचप्रमाणे आगली दस्तावेज उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आहे. जर आम्हांला पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी अहवाल प्राप्त झाला असता, तर आम्हीसुध्दा अभ्यास करुन आलो असतो. आता प्रश्न तक्रार नोंदविण्याचा आहे. तर आम्ही याअगोदर कितीतरी वेळा तक्रारी नोंदविल्या आहेत. काहीही झालेले नाही. आमचा या प्रकल्पास विरोध आहे. | |

५) <u>श्री भूषण रहाटे, उपसरंपच, कोसारा खुटाळा, ता. जि. चंद्रपूर-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | येथे जनसुनावणीस आलेल्या सर्वांचे स्वागत. या बैठकीची ग्रामपंचायतीस अगोदर नोटीस देणे आवश्यक होते. जरी हा प्रकल्प जरी ग्रामपंचायतीस असेल, तरीही प्रकल्पाच्या बाजूची जी सीमा आहे, ही खोसारा-खुटारा ग्रामपंचायतीची सीमा आहे. आपण कुठल्याही प्रकारची सूचना, नोटीस आम्हांला दिलेली नाही. तसेच प्रत्येक कंपनी ही प्रकल्प सुरु होईपर्यतच स्थानिकांना नोकरीत घेण्याचे आश्वासन दिले. एकदा प्रकल्प सुरु झाल्यानंतरच येथील कुठलची कंपनी स्थानिकांना नोकरीची संधि देत नाही. बैठकीत फक्त आश्वासन देण्यात येते. प्रकल्पामुळे स्थानिकांना प्रदूषणाचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. मात्र प्रकल्पात नोकरीची संधि देताना स्थानिकांना डावलण्यात येते. येथे जनसुनावणी बैठकीत काहीही सोय करण्यात आलेली नाही.<br>तरी आमचा, आमच्या ग्रामपंचायतींचा सदरहू प्रकल्पास विरोध आहे. आमची मंजुरी आवश्यक असल्यास आपणास ग्रामपंचायतीसोबत स्थानिकांना विविध संवर्गात नोकरी देण्याबाबत करार करावाच लागेल. परिसरातील ग्रामपंचायती | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की स्थानिकांनी प्रकल्पातील रोजगाराबाबत सूचना उपस्थित केलेल्या आहेत. तर प्रकल्पात स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात येईल. हा प्रकल्प छोटा असल्याने प्रकल्पात सुरवातीस चाळीस लोकांना रोजगाराची संधि देण्यात येईल. ज्या स्थानिक व्यक्तींकडे सक्षम कौशल्य असेल, त्यास निश्चितच प्रकल्पात नोकरीची संधि देण्यात येईल. त्याचप्रमाणे संबंधितांना प्रशिक्षणसुध्दा देण्यात येईल, मात्र त्यासाठी प्रथम प्रकल्पाचे बांधकाम प्रथम पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यावेळी परिसरातील ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधण्यात येईल.<br>त्यावेळी काही स्थानिक उपस्थितांनी एकत्रितपणे जनसुनावणी रद्द करुन परत घेण्याची मागणी केली |

| | | |
|---|---|---|
| | चिचाळ, कोसारा-खुटाळा इ. ग्रामपंचायतींबरोबर आपणास करार करावा लागेल. स्थानिक अभियंते, फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिकशियन इ. विविध संवर्गात जी भरती करावी लागेल, ती स्थानिकांचीच करावी लागेल. अन्यथा या प्रकल्पास आमचा विरोध आहे व भविष्यातही विरोध करण्यात येईल. | |

६) <u>रोशन रामटेके, उप-सरपंच, ग्रामपंचायत खुटाळा-कोसारा, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदरहू प्रकल्पाविषयी आम्हांला काहीही माहिती नाही, त्याचप्रमाणे आताच्या बैठकीविषयीसुध्दा आम्हांला माहिती नव्हती. तरी ही जनसुनावणी बैठक रद्द करुन पुढे बैठक बोलाविण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

७) <u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे की जो प्रकल्पाचे, औद्योगिकीकरणाचे समर्थन करतो. माझ्या मते बेरोजगारी हेच समाजातील प्रदूषण आहे.<br>त्यावेळी उपस्थितांना स्थानिक भाषेत मराठीत किंवा हिंदीमध्ये बोलण्याची सूचना केली. काही स्थानिकांनी स्थानिक मुद्दे उपस्थित करत असताना परराज्यातील व्यक्ताने येऊन प्रकल्पाच्या बाजूने बोलण्याची काहीही गरज नाही असे मत मांडले. त्यावेळी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित व्यक्तीस बोलू देण्याची सूचना केली. श्री रेड्डी यांनी सांगितले की भारतात चाळीस कोटी युवक-युवती रोजगाराच्या संधिची वाट पाहत आहेत. केंद्र सरकार व विविध राज्य सरकार जवळपास ५-६ लाख लोकांना रोजगार | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की श्री रेड्डी यांनी हरित पट्ट्याविषयी सांगितलेली सूचना मान्य करण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | देऊ शकते. तर दरवर्षी सुमारे एक कोटी युवक-युवती नोकरीच्या प्रतिक्षा यादीत येतात. तरी त्यासाठी औद्योगिक प्रगतीची गरज आहे, त्याचप्रमाणे पर्यावरण संतुलन, संवर्धन करण्याची गरज आहे. आपल्या पर्यावरण सल्लागारांनी जल,हवा व वायू प्रदूषणाबाबत सर्वेक्षण केलेले आहे. तरी प्रकल्प परिसरातील लोकांची आरोग्य सद्यस्थिती, पीकउत्पादन सद्यस्थिती सर्वेक्षण करण्यात यावे.<br>त्यांनी सूचना केली की प्रकल्पात जलसंधारण, जलसंवर्धन योजना राबविण्यात यावी. प्रकल्पात पाणी साठवण्यासाठी योजना आखण्यात यावी. प्रकल्पात ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक आहे. मात्र प्रकल्प विकासाने अतिरिक्त हरित पट्टा विकसित करावा. त्यात औषधी वनस्पती व फळझाडे मोठ्या प्रमाणात लावण्यात यावीत.<br>त्याचप्रमाणे मी विनंती करतो की स्थानिकांबरोबरच सीएसआर निधी खर्च करण्यासाठी एक समन्वयक समिती गठीत करण्यात यावी. समितीने आवश्यक असणारी कामेच हाती घ्यावीत.<br>येथे प्रदूषणाबाबत तक्रारी करण्यात आल्या. सदरहू प्रकल्प हा अधिसूचित औद्योगिक विकास परिसरात विकसित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पर्यावरण संरक्षणसुध्दा आवश्यक आहे.<br>मी प्रकल्पाला शुभेच्छा देतो व भारत सरकारला विनंती करतो की संबंधित प्रकल्पास मंजूरी देण्यात यावी. | |

८) सौ. ऋतुजा नरूले, सरपंच, ग्रामपंचायत खुटाळा-कोसारा, ता. जि. चंद्रपूर:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | संबंधित कंपनीने आमच्या ग्रामपंचायतीसोबत कुठलाच पत्रव्यवहार केलेला नाही. येथे जनसुनावणी आहे हेही मला व गावकऱ्यांना माहित नव्हते. | |

९) श्री राहुल बालमवार, जिल्हा उपाध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना:-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आम्ही मिडियामध्ये ऐकतो की चंद्रपूर हे भारतातील सर्वात प्रदूषित शहर आहे. तर आपण बैठकीत सांगावे की कितवे प्रदूषित शहर आहे. आणि जर प्रदूषित शहर आहे, तर अशी प्रदूषण करणा-या कंपन्यांना आपण परवानगी कशी देऊ शकतात. मिडियामध्ये प्रदूषणामुळे दम्यात, हृदयविकारात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे आपण वाचतो. येथे उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी नकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. प्रकल्पास लागूनच वसती आहे. | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू समिती कुठल्याही प्रकल्पास मंजूरी देत नाही, शिफारस करत नाही किंवा प्रकल्प नाकारत नाही. सदरहू सुनावणी ही पर्यावरणविषयक असून आपल्या सूचना, आक्षेप नोंदविणे व ते भारत सरकारला सादर करणे ह्यासाठी आहे. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत निर्णय घेते. आपण केलेली सूचना नोंदविण्यात आलेली आहे. |

त्यावेळी श्री प्रकाश शेंडे यांनी परत जनसुनावणी रद्द करुन परत आयोजित करण्याची मागणी केली. अध्यक्ष यांनी याची नोंद घेतल्याची सांगितले

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ०९ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

(वि. ध. शुक्ला)
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा क्षेत्र अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

(अ. मा. करे)
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

(महादेव खेडकर)
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा ~~उप-विभागीय अधिकारी, मूल, जिल्हा चंद्रपूर~~
अपर जिल्हादंडाधिकारी
चंद्रपूर